संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०
नि. क्र. १९ लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – रेखा रमेश तेटांबे,

**वय**– ६२ वर्षे , **व्यवसाय** – गृहिणी,

**राहणार**– सावर्डे, ता. चिपळून, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून –**

०१. फिर्यादी रमेश तेटांबे हे माझे पती आहेत. दिनांक २४/११/२०१९ रोजी मी माझ्या पती सोबत सावर्डे येथून देवरुख येथे आले होते. आम्ही 'मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग' मध्ये आलो होतो. नयना यादव हिने आमचे दोन रुम घेतले होते. तिने दिलेले दोन धनादेश बाऊंस झाले होते. ती वेळोवेळी पैसे देण्याची हमी देत होती परंतू आम्हाला फसवत होती. आम्ही त्यादिवशी दुपारी १२.१५ वाजता आलो होतो. आम्ही आलो त्यावेळी जोरात आवाज येत होता त्यामुळे माझा पती दुसऱ्या मजल्यावर गेला. तेथे आमच्या फ्लॅट क्रमांक ०९ व १० चे कुलूप तोडून आरोपी नयना आत गेलेली होती. आम्ही तिला बाहेर जाण्यास सांगितले परंतू ती ऐकत नव्हती, तीने ताबा घेतला होता. त्यावेळी तेथे मी, माझा पती, श्री. गवंडी व श्री. खेडेकर असे आम्ही होतो. ती आम्हाला वारंवार त्रास देत होती, त्यामुळे आम्ही कायदेशीर कारवाई सुरु केली. मी आरोपी नयना यादव हिला ओळखते. ती आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे कोणीही वकील हजर नाहीत. आरोपीस विचारण्यात आले की, तिला साक्षीदाराला काही प्रश्न विचारावयाचे आहेत काय, त्यावर तीने सांगितले की, ''साक्षीदाराने जे सांगितले ते खोटे आहे, मला काही विचारायचे नाही''. सबब, उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.06.20 15:27:12 +0530

**(ब. द. तारे)**

दि. २०.०६.२०२४

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in ( Order below Exh.1 in SC.C. No. 200/2020)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 20/06/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 20/06/2024 |
| Evidence uploaded on | :- | 20/06/2024 |